RNI No. MAHBIL/2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ५४] गुरुवार, जुलै २५, २०१३/श्रावण ३, शके १९३५ [पृष्ठे १२ किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १०१

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जुलै २०१३

### अधिसूचना

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.

क्रमांक मुद्रांक. २०१२/३०/प्र.क्र. १८/म-१.—महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) चे कलम ६९ चे पोट-कलम (२) चा खंड (ग) आणि पोट-कलम (३) चे परंतुकानुसार असलेल्या अधिकारांचा वापर करून आणि ही नियमावली तात्काळ अंमलात आणण्याची आवश्यकता आहे अशी महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्यावरून पूर्व प्रसिद्धीची अट शिथिल करून मुद्रांक शुल्काचा भरणा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करण्यासाठी आणि तदनुषंगाने परताव्यासाठी पुढीलप्रमाणे नियमावली निश्चित करण्यात येत आहे :—

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमास महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा आणि परतावा नियम, २०१३ असे संबोधण्यात येईल.

२. **व्याख्या.**—(एक) विषयात आणि संदर्भात याविरुद्ध काही नसेल तर या नियमांत,—

(क) " अधिनियम " म्हणजे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) ;

(ख) " अप्पर मुद्रांक नियंत्रक " म्हणजे प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबईचे प्रमुख आणि प्रधान मुद्रांक कार्यालय प्रमुखाचे काम सोपविलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश असेल ;

(ग) " प्राधिकृत सहभागी बँक " म्हणजे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमा, आभासी कोषागारामध्ये भरण्यासाठी आणि अशा भरणा रकमेची साधी पावती अथवा ई-प्रतिभूतित बँक तथा कोषागार पावती देण्यासाठी, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांनी नियुक्त केलेली सहभागी बँक ;

(घ) " मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी " म्हणजे शासनाने अधिनियमाचे कलम २ चे खंड (घघ) प्रमाणे नियुक्त केलेला अधिकारी ;

(ङ) " सिन " म्हणजे ग्राहकाकडून भरणा रक्कम प्राप्त झाल्यावर प्राधिकृत सहभागी बँकेने दिलेला " चलन ओळख क्रमांक " ;

(च) " जिल्हाधिकारी " म्हणजे अधिनियमाचे कलम २ चे खंड (च) अन्वये नियुक्त अधिकारी ;

(छ) " मुद्रांक उप नियंत्रक " म्हणजे अधिनियमाचे कलम २ चे खंड (छक) प्रमाणे नियुक्त अधिकारी ;

(त) " ई एसबीटीआर " म्हणजे आभासी कोषागारात रकमेचा भरणा झाल्यानंतर प्राधिकृत सहभागी बँकेच्या अधिकाऱ्याने शासनाच्या विशेष सामग्रीवर मुद्रित करून दिलेली " ई प्रतिभूती बँक तथा कोषागार पावती " ;

(झ) " शासकीय जमा व लेखा प्रणाली (ग्रास) " म्हणजे आभासी कोषागाराने रक्कम स्वीकारण्यासाठी आणि त्याचा लेखा ठेवण्यासाठी उपयोगात आणलेली प्रणाली ;

(ञ) " जी आर एन " म्हणजे भरणा रक्कम जमा झाल्यानंतर, आभासी कोषागाराच्या प्रणालीद्वारे निर्मित शासन संदर्भ क्रमांक

(ट) " सहभागी बँका " म्हणजे आभासी कोषागारामध्ये शासकीय रकमेचा भरणा करण्याची सुविधा व सेवा उपलब्ध करून देणाऱ्या, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी नियुक्त केलेल्या बँका ;

(ठ) " ई-भरणा पावती " म्हणजे आभासी कोषागारात झालेल्या मुद्रांक शुल्क भरणा रकमेचा, संलेखाशी संबंधित पक्षकाराचे नाव असलेले, शासन संदर्भ क्रमांक व चलन ओळख क्रमांक नमूद असणारे वार्कारिता विहित नमुन्यातील " ई-चलन "

(ड) " नोंदणी अधिकारी " म्हणजे नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम ५ अन्वये नियुक्त अधिकारी ;

(ढ) " कलम " म्हणजे अधिनियमातील कलम ;

(ण) " साधी पावती " म्हणजे आभासी कोषागारामध्ये मुद्रांक शुल्क, नोंदणी फी आणि इतर रकमेचा भरणा केल्यावर, प्राधिकृत सहभागी बँकेने अथवा पक्षकाराने साध्या कागदावर मुद्रित केलेली पावती ;

(त) " मुद्रांक शुल्क भरणारा " म्हणजे संबंधित संलेखामधील पक्षकार असलेली मुद्रांक शुल्काचा भरणा करणारी कोणतीही व्यक्ती ;

(थ) " आभासी कोषागार " म्हणजे महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम २ चा खंड (एन) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे ;

(दोन) या नियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व संज्ञा यांचा अर्थ उक्त अधिनियमातील अर्थानुसार असेल.

३. **मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमांचा ऑनलाईन भरणा**.---अधिनियमांतर्गत भरावयाचे मुद्रांक शुल्क, नोंदणी अधिनियम, १९०८ अंतर्गत भरावयाची नोंदणी फी आणि इतर रकमांचा भरणा, शासकीय जमा व लेखा प्रणाली (ग्रास) द्वारे आभासी कोषागार ऑनलाईन करता येईल.

४. **साधी पावती मिळण्याची व वापरण्याची कार्यपद्धती**.--(क) मुद्रांक शुल्क भरणारा, प्राधिकृत सहभागी बँकेमार्फत ऑनलाईन किंवा प्राधिकृत सहभागी बँकेच्या काऊंटरवरून, आभासी कोषागारात मुद्रांक शुल्क, नोंदणी फी अथवा इतर रकमांचा भरणा करून साधी पावती प्राप्त करून घेऊ शकेल.

(ख) उक्त प्रमाणे प्राप्त साधी पावती, ही फक्त नोंदणी अधिनियम, १९०८ प्रमाणे, नोंदणी अनिवार्य असलेल्या दस्तांसाठीच वापरता येईल.

(ग) प्राधिकृत सहभागी बँकेने दिलेला चलन ओळख क्रमांक, आभासी कोषागाराने दिलेला शासन संदर्भ क्रमांक व भरणा रकमेशी संबंधित माहिती याचा ताळमेळ, या सर्व बाबी समाविष्ट असलेली साधी पावती, मुद्रांक शुल्क अथवा नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा केल्याचा, एकमेव पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाईल.

**स्पष्टीकरण**.--संलेखातील तपशील आणि रकमेचा भरणा करतांना, भरणा करणाऱ्याने दिलेली माहिती सर्वसाधारणपणे जुळल्या खेरीज ई-भरणा पावती ही भरणा रकमेचा अधिकृत पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाणार नाही.

(घ) या नियमातील व अधिनियमातील सर्व तरतुदींच्या प्रयोजनार्थ, चलन ओळख क्रमांकाचा (CIN) निर्मितीचा दिनांक किंवा शासन संदर्भ क्रमांकाचा (GRN) निर्मितीचा दिनांक यापैकी जो नंतरचा असेल तो दिनांक, मुद्रांक खरेदीचा दिनांक म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

(ङ) मुद्रांक शुल्क भरणाऱ्याने स्वतः निर्मित केलेली साधी पावती स्वस्वाक्षरीने अधिप्रमाणित करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे प्राधिकृत सहभागी बँकेद्वारे निर्मित साधी पावती या नियमातील तरतुदीप्रमाणे बँक अधिकारी / अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करणे बंधनकारक राहील.

(च) खंड (ङ) मध्ये नमूद साधी पावती धारण करणाऱ्याने ज्या नोंदणी अधिकाऱ्याकडे संलेखाची नोंदणी करावयाची आहे, त्याच्याकडून अथवा मुद्रांक शुल्काची भरणा रक्कम ही अधिनियमाचे संबंधित कलमान्वये असल्यास जिल्हाधिकारी यांचेकडून मुद्रांक खरेदीच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत विरुपीत करुन घेणे बंधनकारक राहील.

(छ) साधी पावती, मुद्रांक खरेदीच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत, नोंदणी अधिकारी अथवा विरुपीत (Deface) करण्यास प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून विरुपीत करुन घेतल्या खेरीज ग्राह्य धरली जाणार नाही.

(ज) साधी पावती, प्रकरणपरत्वे नोंदणी अधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर, ते ती विरुपीत करतील आणि विरुपीत ई चलन योग्य प्रकारे साक्षांकित करुन संलेखास जोडतील.

परंतु, जेव्हा-केव्हा । पावती मुद्रांक नोंदणी माहिती तंत्रज्ञान_ । । प्रणालीद्वारे आपोआप विरुपीत झाली असेल, तेव्हा विरुपीताबाबतचा शेरा पुरेसा असेल.

(झ) शक्यतो साधी पावती संलेखाच्या प्रथम पृष्ठावर मुद्रित केली जावी, मात्र मुद्रित करणे शक्य नसल्यास, ती संलेखाच्या प्रथम पृष्ठावर चिकटविणे आवश्यक राहील. ज्या प्रकरणात एका पेक्षा अधिक पावत्यां असतील, अशा प्रकरणांत एकतर त्या पावत्या तारीखनिहाय, क्रमवारीने प्रथम पृष्ठावर मुद्रित करण्यात याव्यात अथवा त्याच पद्धतीने संलेखाच्या सुरुवातीस चिकटविणे आवश्यक राहील. विरुपीत ई-चलन हे जेथे यथास्थिती mil पावती चिकटवण्यात किंवा मुद्रित करण्यात आली आहे त्या पृष्ठाच्या मागील बाजूस चिकटवावे.

परंतु वर नमूद केल्याप्रमाणे विरुपीत ई-चलन जागेअभावी चिकटविणे शक्य नसल्यास, अशा प्रकरणी ते संलेखाचे शेवटी जोडावे.

(ञ) साधी पावती व विरुपीत ई-चलन किंवा विरुपीताचा शेरा, हा नेहमीच संलेखाचा भाग असेल आणि त्याखेरीज सदर संलेख यथोचित मुद्रांकित संलेख म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५. प्राधिकृत सहभागी बँकेने दिलेली ई-एसबीटीआर ची पावती ही नोंदणी अधिनियम, १९०८ प्रमाणे नोंदणी अनिवार्य किंवा ऐच्छिक असलेल्या संलेखांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उमट मुद्रांक म्हणून वापरता येईल. मुद्रांक शुल्कासोबत नोंदणी फी व इतर रकमांचाही भरणा करता येईल. तथापि, जेव्हा मुद्रांक शुल्काचा भरणा करण्यात येणार नसेल तेव्हा ई-एसबीटीआर चा वापर करता येणार नाही.

६. **ई-एसबीटीआर प्राप्त करणे a वापरण्याची कार्यपद्धती.**—(क) ज्यांना ई-एसबीटीआर प्राप्त करावयाचा आहे, ते प्राधिकृत सहभागी बँकेच्या आनलाइन सुविधेचा वापर करुन थेटपणे अथवा प्राधिकृत सहभागी बँकेच्या काऊंटद्वारे, मुद्रांक शुल्काची रक्कम शासनाच्या आभासी कोषागारात भरणा करु शकतील.

(ख) उक्त खंड (क) प्रमाणे भरणा झाल्यावर ज्या प्राधिकृत सहभागी बँकेद्वारा आभासी कोषागारात भरणा झाला आहे ती बँक त्याच रकमेचा ई-एसबीटीआर देईल.

(ग) आभासी कोषागारात रकमेचा भरणा झाल्यापासून लवकरात लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत सहा महिन्याचे अधिनतेने बँकेकडून ई-एसबीटीआर प्राप्त करुन घेण्याची व त्याचा वापर करण्याची जबाबदारी मुद्रांक शुल्काचा भरणा करणाऱ्याची असेल.

(घ) प्राधिकृत सहभागी बँकेने दिलेला चलन ओळख क्रमांक, आभासी कोषागाराने दिलेला शासन संदर्भ क्रमांक व भरणा रकमे संबंधित उपलब्ध माहिती याचा ताळमेळ, या सर्व बाबी समाविष्ट असलेल्या ई-एसबीटीआर, मुद्रांक शुल्क अथवा नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा केल्याचा एकमेव पुरावा म्हणून ग्राहय धरला जाईल.

**स्पष्टीकरण** :- संलेखातील तपशील आणि रकमेचा भरणा करतांना भरणा करणाऱ्याने दिलेली माहिती सर्वसाधारणपणे जुळल्याखेरीज ई-भरणा पावती ही भरणा रकमेचा वैध पुरावा म्हणून ग्राह्य मानली जाणार नाही.

(ङ) मुद्रांक शुल्क भरणाऱ्याकडून ई-एसबीटीआर प्राप्त करवून घेण्यास कोणत्याही कारणास्तव विलंब झाल्यास, त्याच्या वापरास अथवा इतर कोणत्याही बाबतीत मुदतवाढ दिली जाणार नाही.

(च) फक्त प्राधिकृत सहभागी बँका ई-एसबीटीआर निर्गमित करतील.

(छ) रकमेचा भरणा स्वीकारणाऱ्या प्राधिकृत सहभागी बँकांसाठी चलन ओळख क्रमांक (CIN) निर्मिती करणे, ग्रास प्रणालीमार्फत शासन संदर्भ क्रमांक (GRN) प्राप्त करुन घेणे तसेच आभासी कोषागारात रक्कम जमा करणे याबाबतची कार्यपद्धती आभासी कोषागार निश्चित करेल.

(ज) चलन ओळख क्रमांक (CIN) आणि शासन संदर्भ क्रमांक (GRN) प्राप्त झाल्यावर प्राधिकृत सहभागी बँक शासनाच्या पूर्व मुद्रित प्रतिभूतीत सामग्रीवर मुद्रांक शुल्क अदा करणाऱ्यास ई-एसबीटीआर निर्गमित करेल, ज्यामध्ये मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा असल्यास त्याचा तपशील तसेच चलन ओळख क्रमांक (CIN) आणि शासन संदर्भ क्रमांक (GRN) यांचाही समावेश असेल.

(झ) या नियमातील व अधिनियमातील सर्व तरतुदींच्या प्रयोजनार्थ, ई-एसबीटीआर वर नमूद असलेला चलन ओळख क्रमांकाचा (CIN) निर्मितीचा दिनांक अथवा शासन संदर्भ क्रमांकाचा (GRN) निर्मितीचा दिनांक यापैकी जो नंतरचा असेल तो दिनांक मुद्रांक खरेदीचा दिनांक म्हणून मानण्यात येईल.

(ञ) ई-एसबीटीआर हा नेहमीच ज्या संलेखासाठी मुद्रांक शुल्काचा भरणा केला आहे त्याच्या सुरुवातीला जोडणे आवश्यक राहील.

(ट) ई-एसबीटीआरला उमट मुद्रांक शुल्काचा दर्जा राहील आणि उमट मुद्रांकांचे वापरासंबंधात प्रचलित अधिनियमातील आणि त्याखालील नियमातील सर्व तरतुदी लागू असतील.

(ठ) प्रकरणपरत्वे नोंदणी अधिकारी अथवा जिल्हाधिकारी कर्तव्य बजावत असताना त्यांचेकडे ई-एसबीटीआरमार्फत मुद्रांक शुल्काचा भरणा केलेला संलेख प्राप्त झाल्यास ते सदर ई-एसबीटीआर विरुपीत करतील व शक्य असल्यास असे विरुपीत ई-चलन ई-एसबीटीआरच्या मागील बाजूस चिकटवतील.

परंतु वर नमूद पद्धतीने ई-एसबीटीआर जोडण्यास जागा नसेल अशा प्रकरणी विरुपीत ई-चलन संलेखाचे शेवटी जोडता येईल.

परंतु, प्रापृढ असेही की, जेव्हा केव्हा, मुद्रांक व नोंदणी माहिती व तंत्रज्ञान प्रशासन (मारना) प्रणालीद्वारे ई-एसबीटीआर आपोआप विरुपीत झालेले असेल, तेव्हा विरुपीताबाबतचा शेरा पुरेसा असेल.

७ **विवक्षित प्रकरणात ई-चलन हे साधी पावती म्हणून ग्राह्य न धरणे**.—या नियमात काहीही अंतर्भूत iiii आभासी कोषागारात केलेल्या ई-भरणा पावतीस खालील प्रकरणात या नियमाचे प्रयोजनार्थ ई-भरणा पावती म्हणून ग्राह्य धरले जाणार नाही :

(क) शासन कोषागारातून अथवा प्रधान मुद्रांक कार्यालयातून भौतिक मुद्रांक खरेदी करण्यासाठी ई-चलना द्वारे केलेल्या रकमेचा

(ख) सार्वजनिक विक्री किंवा खाजगी वापरासाठीच्या फ्रँकिंग यंत्रासाठी यांनी फ्रँकिंग कोडस् खरेदी करण्यासाठी ई-चलनाद्वारे केलेल्या रकमेचा भरणा.

(ग) एकत्रित मुद्रांक शुल्कांकरिता ई-चलनाद्वारे केलेल्या रकमेचा भरणा

*(4)* जमा झालेल्या ई-स्टॅम्प रकमेचा, ई-चलनाद्वारे केलेला भरणा.

. **ई-एसबीटीआर देण्यासाठी बँकाना प्राधिकृत करणे**.—(क) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी नियुक्त केलेल्या सहभागी बँकेस मुद्राक शुल्क, नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा आभासी कोषागारामध्ये करुन त्याकरिता साधी पावती अथवा ई-एसबीटीआर देण्यासंबंधात मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांनी केलेली प्रस्ताव स्विकृती विनंती स्विकारणे आवश्यक राहील

(ख) ई-एसबीटीआर देण्यासाठी सहभागी बँकांना प्राधिकार देताना शासन महसूलाचे सुरक्षिततेचे दृष्टीकोनातून मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी हे विशिष्ट अटी *a* शर्ती लागू करु शकतील.

(ग) प्रस्तावातील सर्व अटी व शर्ती सहभागी बँकावर बंधनकारक असतील. तसेच सहभागी बँकांवर ई-एसबीटीआर सामुग्री व्यवस्थापन काटेकोरपणे करणे बंधनकारक व सक्तीचे राहील.

(घ) प्रस्ताव स्विकृतीसाठी प्राधिकृत केलेल्या जबाबदार अधिकाऱ्यांने तो साक्षांकित करावा आणि त्या संबंधिचा कोणताही ठराव किंवा प्राधिकार त्यासोबत जोडणे आवश्यक आहे.

*(3)* प्राधिकृत सहभागी बँकेने विशेषपणे विहित करुन सादर केलेला प्रस्ताव मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांना समाधानकारक वाटल्यास, ते बँकेस प्राधिकृत ——बतचे प्रमाणपत्र देतील ***a mi*** एक प्रत प्रधान मुद्राक कार्यालयास अग्रेषित करतील.

(च) एका सहभागी बँकेस केवळ एकच प्राधिकार प्रमाणपत्र दिले जाईल. तथापि या नियमांतर्गत प्राधिकृत सहभागी बँकांच्या शाखांना ही सेवा उपलब्ध करुन घ्यावयाची झाल्यास सदर शाखांच्या नावांची नोंदणी, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचेकडून करुन त्यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशा मान्यताप्राप्त शाखेच्या सेवा खंडित करावयाच्या झाल्यास, त्याबाबतचीही सूचना मुद्रांक नियंत्रक महसूल प्राधिकारी यांना देऊन [illegible] मान्यता घेणे आवश्यक असेल.

(छ) शासन तसेच मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, यांना आवश्यकता वाटल्यास या नियमान्वये [illegible] रद्द करतील

९. **बँकेने साधी पावती अथवा ई-एसबीटीआर मुद्रांकित करणेबाबत**.—(क) [illegible] शुल्क [illegible] बँकांद्वारे [illegible] असलेली ऑन लाइन भरणा सुविधा उपलब्ध करुन देत नसेल तर भरणा रकमेसाठी प्राधिकृत सहभागी बँक त्यास साधी पावती मुद्रित करुन देईल. ही पावती मुद्रांक शुल्क भरणाऱ्यास देण्यापूर्वी त्यावर ~~बँकेने स्वाक्षरी~~ करण्यासाठी प्राधिकृत केलेला अधिकारी स्वाक्षरी करेल.

(ख) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांच्याकडून पुरवठा करण्यात आलेल्या प्रतिभूतीत सामुग्रीवर प्राधिकृत सहभागी बँक, ई-एसबीटीआर मुद्रांकित करेल. त्यावर भरणा रक्कम रुपये पन्नास हजारपेक्षा अधिक नसल्यास बँकेने स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत केलेले एक अधिकारी आणि भरणा रक्कम रुपये पन्नास हजारपेक्षा अधिक असल्यास दोन अधिकारी स्वाक्षरी [illegible]

(ग) हाताळणी मुद्राकनाच्या दरम्यान नुकसान झालेल्या ई-एसबीटीआर सामुग्रींचा तपशील तात्काळ प्रधान मुद्रांक कार्यालय आणि मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांना कळविणे आवश्यक राहील.

(घ) ई-एसबीटीआर देण्यास प्राधिकृत असलेल्या अधिकाऱ्याच्या लगतच्या जेष्ठ अधिकाऱ्यांचो [illegible] चूक झाली असून पुनर्मुद्रणाची आवश्यकता आहे, अशी खात्री पटल्याखेरीज बँकेला पुनर्मुद्रित प्रत देण्याची मुभा असणार नाही

(ङ) पुनर्मुद्रित ई-एसबीटीआरच्या वरच्या भागात तांबड्या शाईने 'पुनर्मुद्रित' असा शेरा देण्यात येईल. तसेच यामध्ये ज्या मूळ ई-एसबीटीआरच्या बदल्यात पुनर्मुद्रण केले आहे, त्याचा क्रमांकही पळताळणीसाठी [illegible]. पुनर्मुद्रित ई-एसबीटीआर वर नियमित प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी व्यतिरिक्त खंड (घ) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांचीही स्वाक्षरी असेल.

१०. **फी अथवा शुल्क आकरणे**.—(क) प्राधिकृत सहभागी बँक, शासन महसूलाचे संकलन करण्यासाठी रिजर्व बँक ऑफ इंडिया यांच्या निकषाप्रमाणे एजन्सी मनौतीस पात्र असेल. तथापि, या व्यतिरिक्त साध्या पावतीकरिता, बँकेला राज्य शासनाकडून किंवा मुद्रांक शुल्क भरणा करणार यांचेकडून, कोणतीही ज्यादा रक्कम आकारता येणार नाही.

(ख) ई-एसबीटीआर साठी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडून प्राधिकृत बँकांना देय एजन्सी मानोता व्यतिरिक्त शासन वेळोवेळी विहित करेल त्यानुसार हाताळणी शुल्क अदा करण्यात येईल.

११. **बँकेने उपवितरकांना प्राधिकृत करणे.**—प्राधिकृत सहभागी बँकेस मुद्रांक शुल्क, नोंदणी फी आणि इतर रकमांचा भरणा करण्याची सेवा पुरविण्यासाठी सहाय्यक म्हणून कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेस, शेड्यूल बँकेस, सहकारी बँकेस किंवा पोस्ट ऑफिस किंवा विद्यमान शासनमान्य परवानाधारक मुद्रांक विक्रेत्यांना उभयपक्षी मान्य अटी व शर्तीवर नियुक्ती करता येईल. तथापि, ई-एसबीटीआर हा केवळ प्राधिकृत सहभागी बँकेकडूनच देण्यात येईल. उपवितरकास कसल्याही व कोणत्याही प्रकारचे शुल्क अथवा फी अदा करण्याचे दायित्व शासनावर असणार नाही.

परंतु याकरिता मुख्य नियंत्रक व महसूल प्राधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

१२. **ई-एसबीटीआर सामुग्रीचा पुरवठा.**—(क) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, हे मुद्रांक नियंत्रक, भारतीय प्रतिभूती मुद्रणालय, नाशिक यांचेशी सल्लामसलत करुन ई-एसबीटीआर साठी आवश्यक सामुग्रीचा तपशील विहित करतील.

(ख) उक्त सामुग्रीचे मागणीपत्र अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई हे मुद्रांक नियंत्रक भारतीय प्रतिभूती मुद्रणालय, नाशिक यांना देतील.

(ग) सामुग्रीचे मागणीपत्र पाठविणे, साठा ठेवणे, लेखोजोखा ठेवणे आणि पुरवठा करणे या सर्वांबाबतची कार्यपद्धती न्यायिकेतर मुद्रांकाप्रमाणेच राहील.

(घ) कोषागार अथवा प्राधिकृत सहभागी बँकेची मागणी व पुरवठ्याबाबत अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई हे स्वतंत्र नोंदवही ठेवतील.

(ङ) अपर मुद्रांक नियंत्रक हे प्राधिकृत सहभागी बँकेस केलेल्या सामुग्रीच्या पुरवठा आणि वापर याचे पर्यवेक्षण करुन बारकाईने देखरख ठेवतील.

(च) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई हे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध साठा आणि मागणी विचारात घेऊन सामुग्रीचा मागणी व पुरवठा निश्चित करतील.

(छ) प्राधिकृत सहभागी बँका स्वःखर्चाने प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथून किंवा शासन कोषागारातून सामुग्री घेऊन जातील आणि त्याकरिता संग्रह नोंदवही ठेवतील.

(ज) प्राधिकृत बँकेने ठेवलेली संग्रह नोंदवही, नेहमीच ऑनलाईन किंवा अन्यथा, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी किंवा अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना केव्हाही तपासणीसाठी उपलब्ध असणे आवश्यक राहील.

(झ) प्रतिभूतित सामुग्री प्राप्त होताच प्राधिकृत सहभागी बँकेने ताबडतोब त्याची तपशिलवार तपासणी करणे आवश्यक आहे. काही तफावत आढळल्यास त्याची माहिती तात्काळ पुरवठा करणाऱ्या प्राधिकाऱ्यास दिली पाहिजे. या संदर्भात काही मतभेद निर्माण झाल्यास अपर मुद्रांक नियंत्रक आणि मुख्य नियंत्रक महसूल अधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल.

(ञ) प्राधिकृत सहभागी बँकेच्या ताब्यातील मुद्रित करतांना किंवा हाताळणी करताना नुकसान झालेली सामुग्री दर तिमाही कालावधीत प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई यांच्याकडे परत करावी लागेल.

(ट) प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई यांच्याकडे मुद्रित करताना किंवा मुद्रित करण्यापूर्वी नुकसान झालेल्या सामुग्रीचा स्वतंत्र लेखाजोखा ठे ात यावा.

(ठ) नुकसान झालेल्या सामुग्रींचा नाश करण्याचे नियमन सध्या अस्तित्वात असलेल्या उमट मुद्रांकाच्या नाशाकरिता असलेल्या ायमानुसार असेल.

(ड) वरील प्रयोजनाकरिता, प्राधिकृत सहभागी बँक प्रधान मुद्रांक कार्यालयाशी समन्वय साधण्यासाठी संपर्क अधिकारी किंवा संपर्क ाखेची नियुक्ती करेल.

१३. **नोंदणी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये.**— (क) नोंदणी अधिकारी किंवा जिल्हाधिकारी हे त्यांची कर्तव्ये र पाडीत असताना त्यांचे समोर साधी पावती (निर्मित किंवा बँकेने दिलेली) किंवा ई-एसबीटीआर प्राप्त झाल्यास ते मुद्रांक शुल्क भरणा त्याच्या संलेखातील तपशिलाची आभासी कोषागारात उपलब्ध तपशिलाबरोबर पडताळणी करतील.

(ख) भरणा रकमेचा खरेपणाविषयी खात्री पटल्यावर प्रकरणपरत्वे नोंदणी अधिकारी किंवा जिल्हाधिकारी चलन विरुपीत करतील संलेखास जोडतील किंवा ते विरुपीत करण्याची कार्यवाही अगोदरच झाली असल्यास त्यावर शेरा देऊन, पदनामासह स्वाक्षरी करतील. शिवाय ते, साधी पावती (स्वनिर्मित किंवा बँकेने दिलेली) अथवा ई-एसबीटीआर, संलेखास जोडला किंवा चिकटविलेला आहे याची खात्री रतील.

(ग) साधी पावती किंवा ई-एसबीटीआरच्या पडताळणीच्या वेळी त्यामध्ये काही गैर करण्यात आले आहे, या निष्कर्षाप्रत नोंदणी धिकारी किंवा जिल्हाधिकारी आल्यास त्यांनी त्याबाबतचा अहवाल त्यांचे वरिष्ठास तात्काळ द्यावा आणि योग्य ती कायदेशीर कारवाई ावी.

१४. **परतावा**.—(क) साधी पावती किंवा ई-एसबीटीआरच्या संदर्भात मुद्रांक शुल्क परताव्याबाबत जिल्हाधिकारी यांनी अवलंबवयाची कार्यपद्धती ही अधिनियमात उमट मुद्रांकाचे परताव्याच्या संदर्भात विहित केलेल्या कार्यपद्धती प्रमाणेच असेल.

(ख) परताव्याबाबतचे देयक तयार करण्याची कार्यपद्धती ही वित्त विभाग व संचालक, लेखा व कोषागारे यांनी वेळोवेळी विहित केलेल्या पद्धतीनुसार राहील.

(ग) उक्त खंड (क) प्रमाणे परतावा देण्यासाठी वजावटीची रक्कम ही मुद्रांक शुल्काच्या १%, कमीत कमी रु. २०० व जास्तीत जास्त रु. १००० मर्यादेच्या अधीन राहील. परंतु प्राधिकृत सहभागी बँकेने चुकीचा किंवा ज्यादा रकमेचा भरणा केला असल्यास आणि तसे आभासी कोषागाराने प्रमाणित केल्यास परतावा रकमेतून वजावट केली जाणार नाही.

१५. **सर्वसाधारण अटी**.—(क) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, अपर मुद्रांक नियंत्रक तसेच या प्रयोजनार्थ प्राधिकृत केलेले अधिकारी यांना प्राधिकृत सहभागी बँकेकडील ई-भरणा रकमेचा लेखा व सामुग्री पूर्वसूचनेने किंवा पूर्वसूचनेशिवाय कोणत्याही वेळी तपासण्याची मुभा असेल.

(ख) प्राधिकृत सहभागी बँकेस या सेवा खंडीत करावयाच्या असल्यास अशाप्रकारे खंडीत करण्यापूर्वी किमान ३० दिवस अगोदर अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांचे 'ना-देय, ना-मागणी' प्रमाणपत्रासह मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांना अवगत करतील.

(ग) शिल्लक सामुग्री तात्काळ अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांच्याकडे प्रत्यार्थिक करणे आवश्यक असेल.

(घ) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी व अपर मुद्रांक नियंत्रक यांनी मागितलेली कोणतीही माहिती विनासबब तात्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक असेल.

(ङ) अपर मुद्रांक नियंत्रक हे ई-एसबीटीआर सामुग्रीचे सर्वसाधारण पर्यवेक्षण आणि व्यवस्थापन करतील.

(च) अपर मुद्रांक नियंत्रक आणि प्राधिकृत सहभागी बँकेमध्ये प्रतिभूत सामुग्रीबाबत काही मतभेद झाल्यास त्याची सुनावणी मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचेसमोर होईल.

(छ) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी हे संबंधित पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देऊन योग्य निर्णय घेतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

(ज) या नियमांचा भंग झाल्यास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शिक्षापात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश नार्वेकर,
शासनाचे उप सचिव.

REVENUE AND FOREST DEPARTMENT
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, Dated - 24 July 2013

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2012/30/C.R. 18/M-1:— In exercise of the powers conferred by sub clause (g) of clause (2) and proviso to clause (3) of section 69 of the Maharashtra Stamp Act. ( LX of 1958), the Government of Maharashtra being satisfied that, circumstances exist to take immediate action and to dispense with the condition of previous publication of these rules, hereby prescribes following rules for payment of stamp duty and refund thereof, by e-payment.

1. *Short Title.*-- These rales, may be called The Maharashtra e-Payment of Stamp Duty And Refund Rules, 2013.

2. *Definitions.* — *(I) In these rules, unless* the *context otherwise requires,*—

*(a)* "Act" means The Maharashtra Stamp Act, (LX of 1958) ;

*(b)* "Additional Controller of Stamps" means and includes the officer in charge of the General Stamp Office, Mumbai and any other officer who has been assigned the work of officer in charge of the General Stamp Office, Mumbai ;

*(c)* "authorised participating bank" ineans the participatory bank appointed by the Chief Controlling Revenue Authority for the purpose of payment of stamp duty, registration fee and other charges in to the virtual treasury and to issue a simple receipt or e-SBTR for the same ;

*(d)* "Chief Controlling Revenue Authority" means an officer appointed by the Government under clause (dd) of section 2 of the Act ;

*(e)* "CIN" means the 'Challan Identification Number" issued by the authorised participating banks on receipt of payment from the customer ;

*(f)* "Collector" means an officer appointed under clause (f) of the section 2 of the Act ;

*(g)* "Deputy Controller of Stamps" means an officer appointed under clause (ga) of section 2 of the Act ;

*(h)* e-SBTR means an electronic-Secured Rank and Treasury Receipt (e- SBTR), issued by the Officer of the authorised participating bank, on special Government stationcry ; on payment, of Stamp Duty in Virtual Treasury ;

*(i)* "Government Keccipt Accounting System (GRAS)" means a system used by the Virtual Treasury for receiving and accounting of Government Revenue ;

*(j)* "GRN means a 'Government Reference Number' generated through the system of Virtual Treasury o

n receipt of Payment ;

*(k)* "Participating Banks" means banks appointed by the Finance Department, Government of Maharashtra, for providing facility and services of making Government Payment into the Virtual Treasury ;

*(l)* "Receipt of e-Payment" means an e-challan consisting of 'Government Reference Number (GRN)' and 'Challan Identification Number (CIN)' disclosing payment of Stamp Duty in Virtual Treasury, in the name of one of the parties to the instrument in the forms specified in this behalf;

*(m)* "Registering officer" means an officer appointed under section 5 of the Registration Act, 1908 ;

*(n)* "Section" means section of the Act ;

*(o)* "Simple Receipt" means a receipt printed on any plain paper by authorised participating bank or the party to the instrument, on payment of Stamp Duty, registration fees and other charges in Virtual Treasury ;

*(p)* "Stamp Duty payer" means any person paying stamp duty, for an instrument,

to which he is a party ;

*(q)* "Virtual Treasury" means the Government Treasury, as defined in clause (n) of rule 2 of

the Maharashtra Treasury Rules. 1968.

*(II)* Words and expressions used but mot defined herein shall have the same meanings as are respectively assigned lo them in the said Act 3.

**3.** Online payment of stamp **duty, registration** fees **and** other **charges.—** The stamp duly required lo be paid under the Act, registration fees required to be paid under the Registration Act, 1908 and other charges may be paid online into the Virtual Treasury through Government Revenue and Accounting System (GRAS).

**4. Mode** of obtaining and using **Simple Receipt.—** *(a)* Stamp duty payer may obtain a Simple receipt by paying the required Stamp Duty or registration fees and other charges to the Virtual Treasury through the. authorised participating bank, either online or at the participating bank counter.

*(b)* **A** simple receipt obtained as above shall only be used in respect of the instruments which arc to be compulsorily registered under the Itegistration Act. 1908.

*(c)* A simple receipt conlaining the 'Challan Identification Number (CIN)' issued by the authorised participating bank, the 'Government Reference Number (GRN)' issued by the Government Virtual Treasury and the reconciled data regarding the amount paid relating to it together shall be treated as sole proof of payment of Stamp Duty or Registration Fee and other charges.

Explanation:— No receipt of e-payment shall be treated as a valid proof of payment, unless the details of instrument for which it applies, tally overall with the details provided by the payer while making payment.

*(d)* The date of generation of the 'Challan Identification Number (CIN)' or the date of generation of the 'Government Reference Number (GRN)' whichever is later, shall be treated as the date of purchase of stamps, for the purpose of these rules and for all other purposes referred to in Act.

*(e)* The simple receipt generated by the stamp duty payer shall, be signed by himself in token of its authentication. Similarly, the simple receipt generated by the authorized, participating bank shall be signed by the officer or officers of the banks as provided in these rules.

*(f)* The holder of the simple receipt mentioned in clause (e) shall get it defaced from the Registering Officer with whom the instrument is to be registered or from the Collector if related with the payment of stamp duty in accordance with relevant sections of the said Act. within sis months from the date of purchase of stamps.

*(g)* No simple receipt shall be treated, as valid unless it is defaced by the registering officer or any other officer authorized to do so within a period of six months from the date of purchase of stamps.

*(h)* The Registering Officer or the Collector as the case may be, on receiving the simple receipt shall deface it and attach the defacement e-challan duly signed by him, to the instrument :

Provided that., as and when the defacement. of the simple receipt is done automatically by the Stamp and Registration Information Technology Administration (SARITA) system, an endorsement of defacement would be sufficient.

*(i)* The simple receipt as far as possible should be printed on the first page of the instrument and if it is not possible to print on the first page then it should bc affixed on the tirst page of the instrument. In case of multiple receipts, either they may be printed serially dote wise on the front pages or similarly affixed on the top of the instrument, the defaced e-challan shall be affixed on the backside of the page where the simple receipt has been affixed or printed as the case may be :

Provided that, if there is no space to affix the defaced e-challan as provided above, then in that case, it should be annexed at the end of the instrument ;

*(j)* The simple receipt and the defaced e-cha'llan or endorsement of defacement shall always be treated as the part of instrument and in absence of it, the instrument shall not be treated as duly stamped.

**5.** e-SBTR issued by the authorised participating bank, can be used as a impressed stamp under the said Act, for instruments which are compulsory or optional to be registered under the

Registration Act, 1908., Alongwith Stamp Duty, Registration Fee and other charges may also be paid. However no e-SBTR shall be used when there is no payment of stamp duty.

**6.** Mode of obtaining and using **e-SBTR.**— *(a)* Anyone requiring an e-SBTR, may directly through the authorised participating bank through online facility or through the authorised participating bank counter pay the stamp duty to the Government Virtual Treasury.

*(b)* On payment of stamp duty as provided in clause (a), the e-SBTR for the actual amount paid shall be issued by the authorised participating bank through which the payment has been made, to the Virtual Treasury,

*(c)* It shall be the responsibility of the stainp duty payer to collect and use the e-SBTR from the bank at the earliest and in any case within the period of six months from the date of payment made in the Virtual Treasury.

*(d)* An e-SBTR obtained on payment of Stamp Outy, Registration Fee and other charges online containing the "Challan identification Number (ON)" issued by the authorised participating bank. the 'Government Reference Number. (GRN)' issued by the Virtual Treasury and the reconciled data regarding the amount paid relating to that "Government Reference Number (GRN)" kept by Virtual Treasury together shall be treated as sole proof of payment of Stamp Duty, Registration Fee and other charges.

*Explanation.*— No receipt of e-payment shall be treated as a valid proof of payment towards Stamp Duty Registration Fee and other charges unless the details of the instrument for which it applies, tally overall with the details provided by the payer while making payment.

*(e)* Any delay on the stamp duty payer in collection of the e-SBTR shall not be considered for extending the period for its use or otherwise,

*(f)* Only the authorised participating bank shall issue e-SBTR.

*(g)* The procedure for the authorised participating bank receiving amount from the payer generating 'Challan Identification Number (CIN)' getting "Government Reference Number (GRN)" from GKAS and crediting the amount to the account of Virtual Treasury will be decided by Virtual Treasury.

*(h)* On having the 'Challan Identification Number (CIN)' and the "Government Reference Number" (GRN), the authorised participating bank shall issue a e-SBTR on the Government pre-printed secure stationery to the stamp duty payer, which shall consist of the details of Stamp Duty, registration fees and other charges if any and also the 'Challan Identification Number (CIN)' and the "Government Reference Number (GRN)."

*(i)* The date of generation of the "Chalian Identification Number (CIN)" or the date of generation of the Government Reference Number printed on e-SBTR, whichever is later, shall be treated as the date of purchase of stamps, for the purpose of these rules and for all other purposes referred in to the Act.

*(j)* The e-SBTR shall always be attached on the top of the instrumcnt, for which the stamp duty is being paid,

*(k)* The e-SBTR shall have the status of impressed stamp and all the prevalent provisions of the Act and the rules framed, thereunder for the use of impressed stamps shall be applicable to e-SBTR also.

*(l)* The Registering Officer or, as the case may be the Collector on coming across the instrument where the stamp duty has been paid by means of e-SBTR whileperforming his duties, shall deface the e-SBTR and if possible the defacement voucher shall be affixed on the backside of the e-SBTR :

Provided that if there is no space to affixed the defacement voucher as provided above, then in that case defacement voucher can be annexed at the end of the instruments :

Provided further that as and when the defacement voucher of e-SBTR is done automatically by the stamp and Registration Information Technology Administration (SARITA) system an endorsement of defacement would be sufficient.

**7. e-challan not be treated as a Simple Receipt in certain cases.** — Notwithstanding anything contained in these rules, following payments made to Virtual Treasury by e-challan shall not be treated as a Receipt of e-payment, for the purpose of these rules :—

*(a)* the e-challan of payment made for purchase of physical stamps from the Government treasuries or from the General Stamp Office, Mumbai.

*(b)* the e-challan of payment made for purchase of franking codes for vendor machine or user machine.

*(c)* the e-challan of payment made for purchase of consolidated stamp-duty.

*(d)* the e-challan of payment of stamp duty collected against issue of e-Stamps.

8. Authorization of **Banks** for issue of **e-SBTR.**— *(a)* The participating bank appointed by Finance Department, Government of Maharashtra, should accept the request for Acceptance of Proposal, for the purpose of payment of stamp duty, registration fee and other charges to Virtual Treasury and issue simple receipt or e-SBTR for the same, floated by the Chief Controlling Revenue Authority.

*(b)* The Chief Controlling Revenue Authority may impose certain terms and condilions which may be necessary to protect the Government revenue, while granting authorization lo participating banks to issue e-SBTR.

*(c)* The participating bank shall abide by all terms and condilions of the proposal. The participating bank shall also abide by the conditions regarding the proper inventory management of e-SBTR. stationery and it should be strictly adhered to.

*(d)* The acceptance of the proposal shall be signed by the responsible officer who is authorize,' to do so and any resolution to that effect or authority shall be annexed thereto.

*(e)* The Chief Controlling Revenue Authority if satisfied with all the specifications provided by the authorised participating bank, shall provide a Certificate of Authorization to the bank with a copy marked to General Stamp Office.

*(f)* Only one Certificate of Authorization will be issued to a single participating bank. However, it shall be mandatory on the nuthorised participating bank to register the names of its branches with the Chief Controlling Revenue Authority and get it's approval, where services referred to in these rules shall be rendered. Discontinuance of service by such approved branches shall also be intimated to and approved by Chief Controlling Revenue Authority.

*(g)* The Government as well as Chief Controlling Revenue Authority shall revoke the authorization granted under these rules, if found necessary.

9. Printing of Simple Receipt or e-SRTR by the bank. — *(a)* The authorised participating bank shall print the Simple Receipt for the Stamp Duty payer who are not availing the online payment facility through net banking. Such print shall be signed by the authorized signatory of the bank. before issuing it lo the stamp duty payer.

*(b)* e-SBTR shall be printed on the secured stationery provided by the Additional Controller of Stamps, Mumbai, to the authorised participating bank. It shall be signed by an authorized signatory of the bank, if the payment does not exceed rupees fifty thousand and by two authorized signalories in case the payment exceed rupees fifty thousand.

(c) The details of e-SBTR damaged during the course of handling and printing shall be immediately reported to the General Stamp Office and Chief Controlling Revenue Authority.

*(d)* No reprinted e-SBTR shall be issued by the bank unless the next higher authority to the issuing authority of the participating bank is satisfied that, genuine error has occurred and there is necessity to issue a reprint.

*(e)* The reprinted e-SBTR shall be endorsed with the word "Reprint" in red ink on the top. Also it shall contain a cross reference regarding the Original e-SBTR Number against which the reprint is issued. The reprinted e-SBTR shall consist the additional signature of the authority mentioned in clause (d) along with the regular signature of the issuing authority.

10. Collection of Fees or charges. — *(a)* The authorised participating banks shall be entitled for Agency Commission from Reserve Bank of India as per the norms for collection of Government revenue. However, the bank shall not be entitled to charge anything over and above from the S'tate Government or the Stamp Duty payer, in case of a Simple receipt.

*(b)* For e-SBTR, handling charges to be paid to the authorised participating banks over and above the agency commission from Reserve Bank of India shall be as may be specified by the Government from time to time.

11. Authorization for Sub-Agents by the bank.— The authorised participating banks may appoint any Nationalized bank, Scheduled bank, Co-operative bank or post. offices or the existing licensed stamp vendors as their agents for assisting them in rendering the services of payment of stamp duty or registration charges on such terms and conditions mutually agreed between them. However, the e-SBTR shall only be issued by the authorised participating banks. The Government shall not be liable to pay any charges or lees of what so ever nature to these sub-agents :

Provided that, it shall be mandatory for the authorised participating bank to get the prior approval of Chief Controlling Revenue Authority.

12. **Supply of e-SBTR stationery.**— *(a)* The Chief Controlling Revenue Authority shall prescribe the details of stationery required for e-SBTR, in consultation with the Controller of Stamps, India Security press, Nashik.

*(b)* The Additional Controller of Stamps, shall make an indent of the above stationery to Controller of Stamps, India Security Press. Nashik.

*(c)* All the process for indenting, storing, accounting and supply of stationer! shall be the same as is applicable for non-judicial stanip paper-s.

*(d)* The Additional Controller of Stamps, shnll maintain separate registers for indention anti supply of stationery to Treasury or authorised participatory banks.

*(e)* The Additional Controller of Stamps, shall supervise and keep a close watch on the stationery supplied and the stationery utilized by the authorisetl participatory banks.

*(f)* The Additional Controller of Stamps, shall decide the quantity of indent supply on the basis of demand and the stock available with his office.

*(g)* The authorised participating banks shall carry tlie required stationery from the General Stamp Office. Mumbai or Government Treasury at their own cost nnd maintain stock register for the same.

*(h)* The stock register maintained by the authorised participatory banks shall always be open inspection online or otherwise whenever called upon by Chief Controlling Revenue Authority Additional Controller of Stamps or any other officer authorised by him

*(i)* On receipt, of the secured stationery, the authorised participating bank shall immediately check in details of stationery provided to it. Any discrepancy shall be immediately reported to authority who has issued the stationery. Regarding any dispute in this behalf. the decision of Additional Controller of Stamps and Chief Controlling Revenue Authority shall be final.

*(j)* The damaged stationery while printing or handling, in the custody of the authorised participating bank shall be returned to the General Stamp Office, Mumbai every quarter.

*(k)* The General Stamp Office: Mumbai shall maintain a separate account for stationery used while printing and stationery damaged before printing.

*(l)* Disposal of damaged stationery would be governed by the prevalent rules, regarding the disposal of damaged impressed stamps.

*(m)* The authorised participating banks shnll appoint a nodal officer or branch to interact with General Stamp Office for tlie above mentioned purposes.

13. Functions of registering officers and collectors.— *(a)* The Registering Officer or Collector receiving any Simple receipt (self generated or issued by the bank.) or e-SBTR while performing his duties shall verify details of payment of stamp duty contained in the instrument the details available with the Virtual Treasury.

*(b)* The Registering Officer or the Collector as the case may be, on being satisfied about genuineness of payment shall deface e-challan and annex it to the instrument or if it is already annexed, endorse it alongwith his signature and designation on it. He shall also ascertain that, the simple receipt (self generated or issued by the bank) or e-SBTR as the case may be, is annexed or attached to the instrument.

*(c)* The Registering Officer or the Collector coming to the conclusion that, any mischief is being played while verifying of simple receipt or e-SBTR, he shall immediately report to his superiors and also take the necessary action as per the law.

14 Refund.— *(a)* The procedure for refund of stamp duty to be adopted by the Collector against Simple receipt or e-SBTR shall be the same as applicable in case of the impressed stamp under the Act.

*(b)* The procedure for preparing refund bill shall be as specified by the Finance Department and Directorate of Treasury, from time to time.

*(c)* The deductions to be made for granting the refund under clause (a) shall be, one percent of the value of stamp refunded with the minimum of rupees two hundred and maximum of rupees one thousand :

Provided that, there shall be no deduction on refund of wrong or excess amount credited to the Government by the authorised participating banker if so certified by Virtual Treasury Office.

15. **General Conditions.—** *(a)* The Chief Controlling Revenue Authority, Additional Controller of Stamps as well as any authority authorized in this behalf, shall have authority to inspect the accounts of e-payments and stationery of authorised participating banks any time with or without intimation.

*(b)* The authorised participating bank desiring to discontinue such services shall intimate the Chief Controlling Revenue Authority along with the "no dues, no demand certificate" from Additional Controller of Stamps atleast 30 days before such a discontinuance.

*(c)* The balance stationery shall be immediately surrendered to the Additional Controller Stamps, Mumbai.

*(d)* Any information called, by the Chief Controlling Revenue Authority and Additional Controller of Stainps shall be provided immediately without any excuse.

*(e)* The overall supervision and inventory management of the e-SBTR stationery shall be done and supervised by the Additional Controller of Stamps.

*(f)* Any dispute between the authorised participating bank and the Additional Controller of Stamps regarding the secured stationery shall.be heard by the Chief Controlling Revenue Authority.

*(g)* The Chief Controlling Revenue Authority after giving the parties reasonable opportunity of being heard, shall pass the appropriaté order thereon and his decision shall be final.

*(h)* Any breach of these rules shall be punishable as provided in the Act.

By order and in the name of Governor of Maharashtra.

RAJESH NARVEKAR,
Deputy Secretary to Governinent

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

22 NOV 2013

महाराष्ट्र शासन

क्रमांक:- बैठक-२०१३/१४१४/प्र.क्र.२५८/म-१

महसूल व वन विभाग,
मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१३.

१) उपसचिव (सहकार),
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

२) अवर सचिव,
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय मुंबई-३२

विषय :- मानीव अभिहस्तांतरण (डिम कन्व्हेयन्स) प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींसंदर्भात दिनांक १९/०७/२०१३ रोजी झालेली बैठक.

संदर्भ :- मा.मुख्यमंत्री सचिवालयाची दिनांक २९/७/२०१३ ची टिप्पणी.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने दिनांक १९/०७/२०१३ रोजी मा.मुख्यमंत्री यांचे मा.अपर मुख्य सचिव यांच्याकडे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त उपरोक्त संदर्भाधीन टिप्पणी सोबत प्राप्त झाले आहे इतिवृत्तातील अनु. क्र.४ येथील निर्णय,"इंडियन रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९०८ मधील कलम ८८ नुसार जिल्हा उप निबंधक तथा सक्षम प्राधिकारी यांना प्रत्यक्ष हजर रहाण्यातून सुट मिळण्याबाबत कायद्यानुसार आवश्यक अधिसूचना निर्गमित करण्याबबात" च्या अनुषंगाने कळविण्यात येते की नोंदणी अधिनियम १९०८ मधील कलम ८८(१) चे खंड (अ) नुसार शासकीय सेवकांना पदीय कक्षेतील दस्त निष्पादनाचे कबुलीजबाबासाठी कायद्यानुसारच सूट आहे. सहकार खात्याचे सह उपनिबंधक हे शासकीय सेवक असल्याने ते खंड(अ) मध्ये मोडतात. त्यामुळे त्यांनी पदीय कक्षेत निष्पादित केलेल्या दस्तांचे कबुलीजबाबासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात हजर रहाण्यातून सूट आहे. सबब त्यांच्यासाठी स्वतंत्र अधिसुचना निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.

(ज्योत्स्ना मु. माडेकर)
कक्ष अधिकारी

प्रत माहितीकरिता :-

१) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विशेष कार्यकारी अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.